# Jowar Production Encouragement Scheme Starts in Dorli

Punya Nagari Vardha Vruthved, July 14, 2009

## ज्वारी उत्पादन प्रोत्साहन योजनेस डोरलीतून सुरूवात

**डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीचा पुढाकार, या वर्षीच्या हंगामात ५० एकरातून सुरुवात, शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्याचा मानस.**

वर्धा, दि. १४ (प्रतिनिधी) - ज्वारी पिकाचे उच्चाटन झाले आहे. अन्नदात्यासमोर गंभीर समस्या उभी असताना डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीने गाव 'अन्न स्वावलंबन' करण्याचा पुढाकार घेतला. विदर्भातून सर्वप्रथम डोरली या गावाची निवड केली असून ५० एकरात ज्वारीचे उत्पादन घेऊन त्याच गावात भांडार व रेशन कार्ड पद्धती वापरून गरजूंना वितरण करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. सतीश यांनी स्थानिक विश्रामगृहावर पत्रकारांशी बोलताना दिली.

गेल्या काही वर्षात नापिकी व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहे. दिवसेंदिवस नापिकीमुळे शेतकऱ्यांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. यामुळेच ग्रामीण भागात सर्वत्र निराशेचे वातावरण आहे. यामुळे गावखेड्यात आनंदाचे वातावरण पसरविण्यासाठी डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीने पुढाकार घेतला आहे. या गैरसरकारी संस्थेचे प्रमुख डॉ. सतीश यांनी १९८४ साली ५ हजार दलित शेतकरी महिलांना सोबत घेऊन संस्थेची स्थापना केली. कोरडवाहू शेती, अन्न सुरक्षा, बियाणे स्वावलंबन, पर्यावरण या क्षेत्रात परिवर्तन घडविण्याचा मानस व्यक्त केला. काही वर्षापूर्वी 'गाव विकणे आहे' ही भूमिका घेतलेले डोरली गाव चर्चेत आले होते. त्या गावातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विविध राजकीय नेते व पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी या गावाला भेट दिली होती. त्यावेळी शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी गावातील उत्पादन गावातच राहण्याच्या दृष्टिकोनातून ज्वारीच्या उत्पादनासाठी शासनाने विशेष लक्ष द्यावे, असा प्रस्ताव ठेवला होता. त्या प्रस्तावाची डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीने दखल घेऊन या वर्षीच्या खरीप हंगामापासून ज्वारी उत्पादन प्रोत्साहन योजना राबविण्याचा निर्णय घेतला. डोरली हे गाव विदर्भातील शेतकऱ्यांसाठी भविष्य व्हावे, अशी मनोकामना व्यक्त करून अन्न सुरक्षा सार्वभौमत्वाच्या चर्चा सुरू आहे. त्याच धर्तीवर हा निर्णय घेतला आहे. गावखेड्यात ज्वारी व बाजरीचे पीक वाढविण्या मागचा उद्देश म्हणजे सर्वांना अन्न, गुरांसाठी चारा, जमिनीची सुपीकता व रोजगार आदींचे मिलन होणार आहे. देशात २०० करोड हेक्टर जमीन आज स्थितीत निकामी असताना या प्रयोगाच्या माध्यमातून त्या जमिनीला चालणा मिळणार आहे. गेल्या १० वर्षापासून सदर कार्य सुरू आहे. निकामी जमिनीमध्ये ज्वारीचे उत्पन्न घेऊन गोरगरीब जनतेला अन्न मिळवून देण्याचा प्रयत्न होत आहे. यामुळे शेतकऱ्यांमधील गमावलेला आत्मविश्वास पुन्हा मिळविता येईल, स्वतःचे भवितव्य स्वतःच्याच हातात राहणार असून विदर्भातील आत्महत्यासुद्धा थांबविण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाची शासन दरबारी दखल घेण्यासाठी सदर कार्यक्रम सतत सुरू राहणार असल्याचे डॉ. विजय यांनी सांगितले.

या वर्षीच्या खरीप हंगामात डोरली येथील ५० एकरात ज्वारीची पेरणी करण्यात आली असून त्या बदल्यात ज्वारीच घेतली जाणार आहे. ती ज्वारी त्याच गावात भंडारामध्ये ठेवून उपेक्षित कुटुंबाला वितरण करण्यात येईल, असेही डॉ. सतीश यांनी सांगितले. यावेळी शेतकरी नेते विजय जावंधिया व डोरली येथील शेतकरी उपस्थित होते.



योजनेबाबत माहिती देताना डॉ. सतीश, विजय जावंधिया.